# माहितीचा अधिकार

## माहितीचा अधिकार

**संपादक : डॉ. शशिकांत अहंकारी**

**अध्यक्ष, हॅलो मेडिकल फाऊंडेशन, अणदूर**

**प्रकाशक :**

हॅलो मेडिकल फाऊंडेशन, अणदूर,
जि. उस्मानाबाद - ४१३ ६०३.
टेलिफॅक्स : (०२४७१) २४६०५० (निवास)
२४६१८२, २४६३८४ (कार्यालय)

सर्व हक्क अध्यक्ष हॅलो मेडिकल फाऊंडेशन, अणदूर

Email - shashikant.hmf@gmail.com

**मुखपृष्ठ :** एस. एस. करपे

**आतील चित्रे :** मिळून साऱ्याजणी व प्रेरक ललकारी मधून साभार

**प्रथम आवृत्ती : २ ऑक्टोंबर २००६**

**द्वितीय आवृत्ती :** ----

**अक्षर जुळणी : प्रविण सोमा**

**मुद्रक : वसुंधरा स्क्रिन**

**देणगी मुल्य :** ₹ **२५/-**

हॅलो मेडिकल फाऊंडेशन ही संस्था गेल्या १२ वर्षापासून आरोग्याच्या क्षेत्रात उस्मानाबाद जिल्ह्यातील ७० गावांमधून प्राथमिक आरोग्य सेवा पुरविण्यासाठी गावपातळीवरील भारतवैद्य आरोग्य कार्यकर्त्या मार्फत कार्यरत आहे. आरोग्याचा संबंध समाजातील सर्वच घटकांशी येतो. स्त्रिया व लहान मुलांचे आरोग्य यावर संस्थेचा अधिकार भर आहे.

आरोग्याच्या प्रश्नाबरोबर संस्था महिला सक्षमीकरणाचेही काम प्रामुख्याने करत आहे. या कामाचा विस्तार करण्यासाठी स्त्रियांमध्ये कायदेशीर, राजकीय व आर्थिक हक्काबद्दल जाणीव निर्माण करणे. उपजिविकेची साधने, महिलांवरील अत्याचार या प्रश्नांची संघटितपणे सोडवणूक करणे. गावपातळीवरील पंचायतराज व्यवस्थेत महिलांचा निर्णय प्रक्रियेत सहभाग वाढवण्यासाठी प्रयत्न यासाठी या गावातील महिलांना विविध प्रशिक्षण, कार्यशाळा, महिला मेळावे, अभ्यास दौरे यांच्या माध्यमातून जागृत करणे यासाठी संस्था विविध पातळीवर कार्यरत आहे.

आपण निवडून दिलेले सरकार कसे काम करते, आपल्या भागातील जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगर परिषदा, स्थानिक स्वराज्य संस्था आपली कर्तव्ये कशी पार पाडत आहेत याची माहिती सर्व सामान्य जनतेला असणे आवश्यक आहे. अशी माहिती मिळवण्यासाठी आता केंद्र सरकारने माहितीचा अधिकार २००५ कायदा अमलात आणला आहे. पुस्तिकेची प्रस्तावना, स्वरूप, त्यातील माहिती यासाठी सावली समुपदेशन केंद्राचे संचालक श्री. सुरेश कंदले, प्रकल्प समन्वयक उपेंद्र टण्णू यांनी सहाय्य करून पुस्तिका तयार केली आहे.

**भुमिका : –**

आपल्या संविधानाद्वारे पुरस्कृत असलेली भारताची लोकशाही म्हणजे '' लोकांनी लोकांसाठी चालविलेले लोकांचे राज्य'' असा अन्वयार्थ अभिप्रेत असून भारताच्या संविधानामधील अनुच्छेद १९ (१) अन्वये नागरिकांना दिलेल्या मुलभूत अधिकाराचा एक भाग म्हणून सर्वोच्च न्यायालयाने (The Supreme Court of India) माहितीच्या अधिकारास मान्यता दिलेली आहे. लोकशाही कार्यप्रणालीमध्ये भारताचा नागरिक हा सार्वभौम (Sovereign of India) व शासनकर्ते आणि शासनामध्ये अधिकृतपणे कार्यरत असलेले शासनाचे नोकर हे लोकसेवक ( ) म्हणून निदर्शित केलेले आहे. महाराष्ट्र राज्य शासन आणि भारताचे केंद्र शासन यांनी माहितीच्या अधिकाराचा कायदा संमत करून एका नव्या पर्वास सुरुवात केलेली आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम इ. स . २००५ मध्ये अस्तित्वात आला. त्यापूर्वी इ. स. २००२ पासून महाराष्ट्रात माहितीचा अधिकार हा कायदा होता. आता हा कायदा केंद्र सरकारने केला आहे. म्हणून तो देशभर लागू झाला आहे. पण नेमका हा काय कायदा आहे? त्यात कसल्या तरतुदी आहेत? या कायद्याखाली कोणती माहिती मिळते? कोणाकडे माहिती मागावी लागते? त्यासाठी कसा अर्ज करायचा? माहिती मिळाली नाही तर काय करावयाचे? असे अनेक प्रश्न लोकांच्या मनात आहेत. या प्रश्नांना उत्तर देण्याचा प्रयत्न म्हणजे ही पुस्तीका.

भारतामध्ये ब्रिटिशांकडून वारसाने आलेल्या प्रशासकीय पध्दतीमध्ये प्रशासकीय कारभाराचा बहुतांश भाग हा गोपनीय झालेला आहे. सरकार चालते ते जनतेने भरलेल्या करातून यामध्ये लोकसहभाग फक्त लोकप्रतिनिधींचा सहभाग असा मर्यादित झालेला होता. पण पुढे शासकीय व्यवस्थेच्या संक्रमणाच्या काळात प्रजा, जनता, नागरिक हा प्रवास आता नागरिक ते जागरूक नागरिक असा झाला आहे. लोकांनी लोकांसाठी चालविलेले लोकांचे राज्य ही कार्यप्रणाली ध्यानी घेता माहितीच्या अधिकाराचा कायदा हे त्या दृष्टीने पडलेले महत्वाचे पाऊल होय.

निकोप, सदृढ लोकाभिमुख आणि लोकहिताच्या कारभाराच्या दृष्टीने

असा अधिकार जनतेला असणे आणि जनतेने त्याचा सकारात्मक पण प्रभावीपणे प्रयोग करणे नितांत गरजेचे आहे.

अलिकडे आपण प्रस्थापितांचा एक वेगळी अधिसत्ता अर्थात अधिकार गाजवणारा प्रभावी गट समाजामध्ये पाहतो आहोत. असे सत्ता चालविणारे जनतेपासून लपवून, जनतेला अंधारात ठेवून अथवा जनतेची दिशाभूल करून जनतेच्या अज्ञानाचा गैरफायदा उठवून अनेक अवैध कार्य करत असतात. यामधून भ्रष्टाचार बोकाळलेला आहे. जनतेच्या पैशाचे अमर्याद नुकसान तर होत आहेच पण जनतेचे मानसिक संतुलन देखील बिघडत आहे. त्याचा प्रशासन कार्यप्रणालीवरील विश्वास संपत आहे. प्रशासनाच्या माध्यमातून सार्वजनिक कारभारात जेवढी पारदर्शकता येईल तेवढा अशा गैरकृत्याला आळा बसू शकेल.

लोकांच्या गरजा अधिक चांगल्या प्रकारे लक्षात घेऊन शासन आणि प्रशासन लोकाभिमुख होण्याच्या प्रक्रियेस या कायद्याने चालना मिळेल. प्रशासनात लोकसहभाग वाढून सुशासन प्रस्थापित होईल. एक अंकुश म्हणऊन याचा अनुकूल परिणाम सहजपणे दृष्टीक्षेपात येऊ शकेल.

या कायद्याची पार्श्वभूमी, त्याचे महत्व स्वरूप आणि त्याचा यथायोग्य असा कायद्याच्या कक्षात राहून वापर करणे याची माहिती लोकांना होणे अत्यंत गरजेची आहे, माहितीचा अधिकार मूलभूत आहे.

एक महत्त्वाचे लक्षात ठेवणे आवश्याक वाटते की, या कायद्याचा जनहित लक्षात घेऊनच उपयोग करावा. अधिकाराबरोबर कर्तव्येही असतात याची जाण असणे आवश्यक आहे. कायद्याप्रमोच याचा वापर करावा. ''काय द्या? (कायतरी द्या नंतर पुढे पाहू) असा विकृत विचार कोणी करता कामा नये.

आपण निवडून दिलेले सरकार कसे काम करते आपल्या भागातील जिल्हा परिषद, पंचायत समिती, महाराष्ट्र तथा केंद्र शासनाची कार्यालय, नगर परिषद, स्थानिक स्वराज्य संस्था आपली कर्तव्य कशी पार पाडीत आहेत याची माहिती जनतेला असणे आवश्यक आहे.

कायद्याची भाषा किचकट असते. तशी ती असतेच म्हणून कायदा वाचुनही तरतुदी लक्षात येत नाहीत. कायदा सोपा करून सांगणे सुध्दा कठीण आहे. म्हणून कायद्याची ढोबळ ओळख करून देणे एवढ्यापुरता या पुस्तिकेचा हेतू आहे. मूळ कायदा कायद्याच्या पुस्तीकेतून वाचुन समजावून घ्यावा असा सल्ला म्हणूनच द्यावा वाटतो. म्हणजे या पुस्तिकेत काही अडचण असेल तर कायद्याचे पुस्तक प्रमाण मानणे योग्य.

देशातला सर्व कारभार सर्वांना समजावा, असा पारदर्शक असावा हा मुख्य हेतू या कायद्याच्या मागे आहे. गोपनियतेचा आधार घेऊन भ्रष्टाचाराचे कुरण असा जमाना होता. जनतेच्या पाठिंब्याने सरकार येणार पण त्या सरकारचे हातपाय असलेले अधिकारी कर्मचारी जनतेच्या हिताला बाधा आणणारे निर्णय घेणार. वर ते लोकांना माहिती होवू नये म्हणून झाकून ठेवणार! असा सारा प्रकार होता. माहिती अधिकाराच्या कायद्याने सगळा कारभार स्वच्छ, स्पष्ट व्हायला मदत होईल. हा कायदा २००२ पासून महाराष्ट्रात लागू झाला. पण त्याचा वापर खूपच मर्यादित केला गेला म्हणून गाव, वाडी, वस्ती, शहर यामध्ये राहणाऱ्या लोकांनी, महिला व पुरुष या सर्वांनी माहितीच्या अधिकाराच्या कायद्याची ओळख करून घ्यावी आणि त्याचा जास्तीत जास्त वापर करता यावा म्हणून ही पुस्तीका.

**संविधान आणि माहितीचा अधिकार :-**

भारतीय संविधानाने प्रत्येक भारतीय नागरीकाला अभिव्यक्तीचे स्वातंत्र्याचा मूलभूत हक्क दिला आहे. या हक्कात नागरीकाला आपले मत बनविण्याचे आणि ते व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य दिलले आहे. कोणत्याही विषयात मत बनवायचे तर त्यासाठी त्या विषयाची माहिती हवी. पूर्वी अशी माहिती मिळविण्यात काही अडचणी येत होत्या कारण माहिती मिळविण्याचा अधिकार नव्हता. माहितीचा कायदा नव्हता. ही उणीव माहिती अधिकाराच्या कायद्याने भरून निघाली आहे. हा कायदा भारतीय संविधानाने दिलेला स्वातंत्र्याचा मुलभूत हक्क बजावण्यासाठी उपकारक ठरला आहे. प्रत्येक व्यक्तिला माहिती घेण्याचा जन्मतः नैसर्गिक अधिकार आहे. या अधिकाराला संविधानात्मकरित्या मान्यता देण्याचे काम माहिती अधिकाराच्या कायद्याने केले आहे म्हणून माहितीचा कायदा समजावून घेणे आणि त्याचा जास्तीत जास्त वापर करणे हे काम संविधानाने दिलेल्या हक्काची अंमलबजावणी करण्यासारखे आहे.

**माहिती म्हणजे काय?**

माहितीचा अधिकार कायद्यात माहिती म्हणजे काय याचे वर्णन दिले आहे. त्यामध्ये खालील मुद्यांचा समावेश होतो.

१. इलेक्ट्रॉनिक्स स्वरुपात (संगणकाद्वारे) असलेले अभिलेख (रेकॉर्ड)
२. दस्तऐवज
३. मेमो
४. मेमो, मते, सल्ले
५. बातम्या, प्रकाशने
६. परिपत्रके (सर्क्युलर, जी. आर.), आदेश
७. कंत्राटे, नमुने, प्रतिमाने
८. आधारभुत माहिती
९. अंमलात असलेल्य इतर कोणत्याही कायद्याखाली सरकारी अधिकारी/सरकार मदतीने चालणाऱ्या खाजगी संस्था यांच्याशी संबंधीत माहिती.

थोडक्यात गावच्या ग्रामपंचायत पासून दिल्लीच संसदेपर्यंत. राज्य व केंद्र शासनाच्या सर्व कार्यालयांशी संबंधित कोमतेही म्हणजे फार थोडे अपवाद करता कागदपत्रे माहितीच्या अधिकारात मागता येतात. मात्र त्यासाठी योग्य त्या पध्दतीने अर्ज, आवश्यक ती फी भरून पावती घेणे आवश्यक आहे. पुढे त्याबाबत सविस्तर माहिती दिलेली आहेच.

**माहिती कोणाकडून मिळू शकते?**

कोणती माहिती मिळू शकते हे आपण वर पाहिले. अशी माहिती मिळविण्यासाठी कोणाकडे जायचे असा प्रश्न तुमच्या मनात येईल. माहितीच्या अधिकाराचा कायद्यानुसार प्रत्येक कार्यालयाने आपला माहिती अधिकारी कोण हे स्पष्टपणे, त्यांच्या कार्यालयात गेले की लक्षात येईल. पण समजा अशी पाटी त्या कार्यालयात लावलेली नसेल तर त्या ठिकाणच्या कर्मचाऱ्याकडे आपण त्याबाबत चौकशी करू शकतो. तो ही माहिती आपणास देईल. पण समजा त्यानेही अशी माहिती दिली नाही तर साधारणपणे त्या-त्या कार्यालयाचा प्रमुक अधिकारी हा त्या कार्यालयाचा माहिती अधिकारी असतो. त्याच्या नावाने माहिती मिळणे या बाबतचा अर्ज लिहावा. समजा आपल्या अर्जात माहिती अधिकाऱ्याचे नाव चुकले तरी फार बिघडत नाही. आपण असा चुकीचा अर्ज अधिकाऱ्याकडे दिला तरी त्या अधिकाऱ्याने तो अर्ज योग्य त्या अधिकाऱ्याकडे पाठविणे ही त्याची जबाबदारी आहे. असे अर्ज योग्य त्या अधिकाऱ्याकडे पाठविले जातात असा अनुभव आहे. माहिती मिळविण्याबाबतचा अर्ज माहिती अधिकाऱ्यांच्या नावाने लिहीला पाहिजे हे मात्र करायला हवे.

माहिती मिळविण्याचा ठरलेला अर्ज कसा असतो?

माहितीच्या अधिकाराखाली माहिती मिळविण्यासाठी विहित (ठरलेला) अर्ज खालील प्रमाणे असतो.

नमुना पत्र - 'अ' (नियम क्र. ३)

**केंद्र शासन माहितीचा अधिकार अधिनियम २००५**

दहा रूपयाचे कोर्ट फी स्टँप

प्रति,

शासकीय माहिती अधिकारी
(अधिकाऱ्याचे पदनाम)
(कार्यालयाचे नाव व पत्ता)

१. अर्जदाराचे संपूर्ण नांव :-
२. अर्जदाराचा पत्ता :-
३. आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील
एक) माहितीची विषय
दोन) माहितीशी संबंधित कालावधी
तीन) आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन
४. माहिती टपालाद्वारे किंवा व्यक्तिशः आवश्यक किंवा कसे
(प्रत्यक्ष टापल खर्च अतिरिक्त शुल्कामध्ये समाविष्ट केला जाईल)
५. टपालाद्वारे असेल तर त्याबाबत (सर्वसाधरण, नोंदणीकृत किंवा शीघ्र)
६. ज्यासाठी माहिती आवश्यक आहे ते प्रयोजन
७. अर्जदार दारिद्रय रेषेखालील आहे का?
(असल्यास त्याबाबतचा पुरावा द्यावा)

ठिकाण :-
दिनांक :- अर्जदाराची स्वाक्षरी

माहिती मिळविण्याकरिता विहीत नमुना अर्ज वर दिला आहे. तो कसा भरावा हे पाहू. माहिती अधिकारी म्हणजे ज्या अधिकाऱ्याकडून माहिती हवी त्याचे नांव. उदा. ग्रामसेवक, सोसायटीचा सचिव, तहसीलदार वगैरे. (त्या कार्यालयाचा माहिती अधिकारी) त्याचे कार्यालयाचे नाव त्याखाली लिहावे. त्याखाली गावाचे नाव, पोस्ट, तालुका, जिल्हा इ. लिहावे.

ज्याने माहिती मागितली आहे. त्याचे संपूर्ण नाव व पत्ता लिहावा. नाव संक्षेपात लिहू नये. पत्ता सविस्तर द्यावा. पोष्टाचे पत्र येण्यासाठी काय लिहीणे आवश्यक आहे ते पत्त्यात लिहावे. मुक्काम व पोस्ट वेगवेगळे असतील तर तसे स्पष्ट लिहावे. तालुका व जिल्हा लिहायला विसरू नये. माहिती शक्यतो नावाने मागावी. त्या व्यक्तिच्या पदाचा उल्लेख करायला हरकत नाही.

रकाना क्र. ४ मध्ये आपण माहिती कशी घेऊन जाणार याबाबतची माहिती नमुद करावयाची आहे. माहिती शक्यतो 'समक्ष' किंवा 'व्यक्तीशः' असे लिहावे. जर तसे शक्य नसेल तर 'टपालाने' असा शब्द लिहावा.. 'समक्ष' माहिती घ्यायची असेल तर 'तारीख कळवावी' असे यापुढे लिहावे.

माहिती टपालाने घ्यायची असेल तर कोणत्या प्रकारच्या टपालाने पाहिजे याा उल्लेख रकाना क्र. ५ मध्ये लिहावे. टपालाचे सर्वसाधारण रजिस्टर वगैरे प्रकार रकान्यात नमुद करावेत. त्याची जास्तीची फी नंतर भरावी लागते. साध्या टपालाने माहिती मागविली तर टपालाचे पैसे भरावे लागत नाहीत. रजिष्टर्ड पोष्टाने वगैरे माहिती पाहिजे असेल तर त्याचे जादा पैसे भरावे लागतात.

रक्राना क्र. ६ हा भरावा लागतो असे बंधन नाही. तो रकाना कोरा ठेवला तरी चालतो. पण समजा तो भरावयाचा असेल तर सोयी प्रमाणे 'व्यक्तिगत अभ्यासासाठी', 'जनतेच्या हितासाठी', 'न्यायालयाच्या कामासाठी' असे शब्द वापरावेत.

रकाना क्र. ७ मध्ये माहिती मिळविण्यासाठी अर्ज करणारा इसम दारिद्रय रेषेखालील असेल तर तसा उल्लेख या रकान्यात 'होय' किंवा 'नाही' असा करावयाचा आहे. जर उत्तर होय असेल तर दारिद्रय रेषेखाली संबंधीचा यादीतील क्रमांकाबाबत ग्रामसेवकाचे प्रमाणपत्र झेरॉक्स करून जोडावे. दारिद्रय रेषेखाली असणाऱ्या अर्जदारास माहिती मोफत देण्याबाबत कायद्यात तरतुद आहे.

**अर्जावर तिकीट किती व कोणते लावावे.**

माहिती अधिकाराखाली माहिती मागण्याच्या अर्जावर 'तिकीट' च्या जागी रू. १० किमतीचे कोर्ट फी स्टँप लावणे आवश्यक आहे. त्याशिवाय हा अर्ज पूर्ण होत नाही. अपूर्ण अर्जाने मागितलेली माहिती दिली जात नाही. कोर्ट फी चे तिकीटे तहसील कार्यालय, कोर्ट, रजिष्टर ऑफीस इ. ठिकाणी मिळतात. त्याची किंमत रू. १, रू. ५ किंवा रू. १० अशी असते. यापैकी कोणतीही तिकीटे लावता येतील मात्र त्याची किंमत रू. १० व्हावी हे बंधनकारक आहे.

आशा संपूर्ण भरलेल्या अर्जावर शेवटी अर्जदाराने स्वतःची सही किंवा निशाणी अंगठा करायचा आहे. अर्जावर अर्जदाराचे ठिकाण व अर्जाचा दिनांक लिहावयाचा आहे. या तारखेपासून या अर्जाची मुदत सुरु होते.

अर्जाची पावती घ्यावी.

वर नमुद केल्याप्रमाणे अर्ज संपूर्ण भरला, त्यावर तिकीट लावले, त्यावर सही केली. यानंतर या अर्जाची एक झेरॉक्स प्रत करावी. शक्य नसेल तर पुन्हा असाच एक अर्ज तयार करावा किंव कार्बन घालून त्याची प्रत तयार करावी. फक्त त्यावर तिकीटे लावू नयेत. झेरॉक्स किंवा दुसरा अर्ज, कार्बन कॉपी दोन्ही प्रती घेऊन ज्या कार्यालयाकडे हा अर्ज द्यावयाचा आहे. त्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत, सुट्टीच्या दिवस सोडून जावे. तिकीट लावलेला अर्ज देऊन दुसऱ्या प्रतीवर संबंधिताची पोहोच पावती घ्यावी. पावती घेणे आवश्यक आहे. त्याशिवाय पुढे अपिल करता येणार नाही. काही कार्यालयात कुण्यातरी अधिकाऱ्याची मुळ प्रतीवर सही घ्यायला लावतात. ती सही घेऊनच मग पावती घ्यावी.

महत्ताचे म्हणजे अर्ज कोणत्याही परिस्थितीत अपूरा ठेऊ नये. त्यावर रु. १०/- ची कोर्टाची तिकीटे लावावीत, अर्जावर तारीख लिहावी. सही करावी आणि पावती घ्यावी. अर्ज टाईप करण्याची सक्ती नाही. गरज नाही. हाताने अर्ज लिहिला तरी चालतो.

माहिती अर्जाची माहिती कशी दिली जाते :-

अर्जदाराने माहितीचा अर्ज दिल्यानंतर संबंधित अधिकारी घ्यावयाच्या माहितीचा तपशील काढतो. मागितलेली माहिती झेरॉक्स करायची असेल तर त्याला लागणारा खर्च भरण्याबाबत अर्जदारास कळवितो. साधारणपणे एका कागदाला रु. २ प्रमाणे झेरॉक्सचा खर्च येतो. हा खर्च अर्जदारास कळविणे बंधनकारक आहे. त्याने तसे कळविल्यानंतर अर्जदाराने सांगितलेली झेरॉक्स खर्चाची रक्कम रोख त्या कार्यालयात भरावी लागते व पावती घ्यावी लागते. समजा विचारलेली माहिती झेरॉक्स करण्याची गरज नाही. तेव्हा माहिती अधिकारी अर्जदाराने मागणी केल्याप्रमाणे माहिती पोष्टाने पाठवितो किंवा माहिती तयार आहे. समक्षात येऊन घेऊन जा असे कळवितो. पोष्टाने मिळालेली माहिती किंवा समक्षात मिळालेली माहिती आपण मागितल्याप्रमाणे आहे का? हे तपासून पाहिले पाहिजे.

कोणत्या प्रकारची माहिती मिळू शकत नाही?

साधरणपणे कोणतीही माहिती माहितीच्या अधिकाराखाली मिळू शकते. पण काही खालील कारणासंबंधित माहिती या कायद्याखाली सुध्दा मिळू शकत नाही. पण ही कारणे खूप कमी आहेत. शिवाय गावपातळी, तालुका व जिल्हा पातळीवर आपण मागितलेल्या माहितीला बहुतेकवेळा माहिती नाकारण्याची कारण`लागू पडत नाहीत. त्यापैकी आपणाला लागू पडू शकतील अशी कारणे खालील प्रमाणे आहेत.

१. संपूर्ण देशाच्या एकात्मतेला, सुरक्षेला धोका निर्माण होईल अशी माहिती.
२. न्यायालयाने माहिती उघड करण्यास बंदी घातलेली माहिती किंवा माहिती पुरविण्यामुळे न्यायालयाचा अपमान होईल अशी माहिती.
३. विधानसभा, लोकसभा किंवा विधीमंडळाच्या विशेष अधिकाराचा भंग होईल अशी माहिती.
४. जी माहिती सार्वजनिक नाही किंवा व्यक्तिच्या खाजगीपणाशी संबंधित अशी माहिती.
५. शासकीय गुपिते अधिनियम १९२३ अन्वये माहिती उघड करण्यात प्रतिबंध केला आहे अशी माहिती

**माहिती अधिकाराखालील अर्ज कसा निकाली निघतो :–**

माहितीच्या अधिकाराखाली दिलेला अर्ज खालील पद्धतीने निकाली काढला जातो.

१. मागणी केलेली माहिती देणए शक्य असेल तर ती माहिती तीस (३०) दिवसात कळविली जाते.

२. माहिती झेरॉक्स काढणे आवस्यक असेल त्यासाठी अर्जदाराला पैसे भरायला सांगणे, त्याने पैसे भरले की कागदपत्राचे झेरॉक्स काढून घेऊन ते तीस (३०) दिवसांत अर्जदारास द्यावी.

३. अर्जदारास द्यावयाची माहिती एकत्रित करण्यासाठी तीस (३०) दिवसांची मुदत अपुरी वाटत असेल तर त्या अधिकाऱ्याने अर्जदारास माहिती देण्यासाठी मुदतवाढ विनंती करावी. अर्जदाराने इच्छेप्रमाणे मुदतवाढ द्यावी किंवा देऊ नये. त्याने मुदतवाढ दिली तर त्या मुदतीत अर्जदारास माहिती द्यावी. मात्र अशावेळी झेरॉक्सचा खर्च अर्जदाराने देणे आवश्यक नाही.

४. अर्जदाराने मागणी केलेली माहिती ज्या कारणामुळे देणे शक्य नसेल ते कारण नमुद करून तीस (३०) दिवसात तसे अर्जदारास कळवावे.

मात्र वरीलपैकी कोणत्याही पद्धतीने अर्ज निकाली काढला तर दिलेल्या उत्तरावर अर्जदार नाराज असेल तर त्याने त्याविरूध्द कोणाकडे आणि किसी दिवसात अपिल अर्ज करायला हवा याचा उल्लेख करून अर्जदारास कळवावे.

पहिले अपिल कधी आणि कोणाकडे करता येते?

अर्जदारास पुरविण्यात आलेली माहिती समाधानकारक नसेल किंवा मुदतीत माहिती पुरविली गेली नाही तर पहिले अपिल करता येते. अर्जदारास माहिती पुरवितांनाच या माहितीने अर्जदाराचे समाधान झाले नसेल तर तो पहिले अपिल करू शकतो असे नमुद केलेले असते. अपिल करण्याची मुदत सुध्दा दिलेली असते. समजा माहिती पुरविली गेली नाहीच तरी पहिले अपिल करता येते. अपिल मुदतीत करायला हवे ही मुदत खालील प्रमाणे आहे.

१. माहिती अर्जाद्वारे मागितलेली माहिती मुदतीत पुरविण्यात आलेली आहे. पण ती अपुरी किंवा असमाधानकारक आहे तेव्हा अशी माहिती मिळाल्यापासून तीस (३०) दिवसात पहिले अपिल करता येते.

२. पुरविण्यात आलेली माहिती खोटी आहे किंवा माहिती मागविण्याप्रमाणे न देता

दुसरीच दिलेली आहे. अशी माहिती मिलाल्यापासून तीस (३०) दिवसात पहिले अपिल करता येते.

३. अर्जदाराने माहिती मिळविण्यासाठी अर्ज देऊन तीस (३०) दिवस होऊन गेले आहे. ही तीस (३०) दिवसांची मुदत संपल्यानंतर सुध्दा मागणी केलेली माहिती दिली गेली नाही तेव्हा तीस (३०) दिवसात पहिले अपिल करता येते.

**पहिले अपिल कोणाकडे करावे :–**

माहितीच्या अर्जाची माहिती पुरवितांना अर्जदार याचे समाधान झाले नाही तर त्याने कोणाकडे अपिल करावे याबाबतचा उल्लेख असतो. अशा अधिकाऱ्याकडे खालील विहीत नमुन्यात पहिले अपिल वर नमुद मुदतीत दाखल करावे. समजा अपिल कोणाकडे करावे याचा उल्लेख केला गेला नसेल तर ज्या अधिकाऱ्याकडे माहिती मिळविण्यासाठी अर्ज केला होता. त्यापेक्षा लगतचा मोठा अधिकारी हा सर्वसाधारणपणे अपिल अधिकारी असतो. उदा. ग्रामसेवकापेक्षा गट विकास अधिकारी, तहसीलदारापेक्षा उपविभागीय अधिकारी वगैरे, अशा अधिकाऱ्याकडे खालील नमुन्यात अपिल करावे. समा अपिल अधिकाऱ्याचे पदनाम चुकले तरी त्या अधिकाऱ्याने योग्य अधिकाऱ्याकडे अपिल अर्ज पाठवावा लागतो. तरीही शक्यतो योग्य त्या अधिकाऱ्याकडे अपिल अर्ज द्यावा. अर्जामध्ये अपील अधिकारी असा उल्लेख जरूर करावा.

**पहिल्याअपिल अर्जाचा नमुदा**

**जोडपत्र 'ब'**

(नियम ५(१))

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम (१९) (१) खालील अपिल

रू. २० चा कोर्ट फी स्टँप

प्रेषक : - (अपिल करणाऱ्याचे नाव व पत्ता)

प्रति,

(अपिल अधिकाऱ्याचे नाव, पदनाम, पत्ता)

१. अपिलकाराचे संपूर्ण नाव :-
२. पत्ता :-
३. राज्य जन माहिती अधिकाऱ्याचा तपशील
४. ज्या आदेशाच्या विरूध्द अपिल केले आहे तो आदेश मिलाल्याचा दिनांक (आदेश काढला असल्यास)
५. अपिल दाखल करण्याचा अंतिम दिनांक
६. अपिलाची कारणे
७. माहितीचा तपशील
एक) हव्या असलेल्या माहितीचे स्वरूप व विषय
दोन) माहिती ज्या कार्यालयाशी किंवा विभागाशी संबंधित आहे त्याचे नाव

ठिकाण :-

दिनांक :- अपिलकाराची सही

**अपिल अर्ज कसा भरावा ?**

माहितीचा अर्जातील बहुतेक मजकूर अपिल अर्जात पुन्हा भरावा लागतो. तो अर्ज कसा भरावा हे आपण वर पाहिले आहेच. या अपिल अर्जात प्रेषक आणि अपिलकाराचे नाव, पत्ता हे एकच येणार आहे. राज्य जन माहिती अधिकारी म्हणजे आपण माहितीचा अर्ज दिला होता त्या अधिकाऱ्याचे नाव, पदनाम लिहावे. जी माहिती चुकीची, अर्धवट असमाधानकारक आहे म्हणून आपण अपिल करत आहोत ती माहिती आपणास कधी दिली गेली त्याची तारीख रकाना क्र. ४ मध्ये लिहावी. माहिती दिली नसेल तर नाही असे लिहावे. रकाना क्र. ५ मध्ये ज्या आदेशाविरूध्द अपिल करीत आहोत तो मिळाल्यापासून तीस (३०) दिवस झाले नंतरची तारीख नमुद करावी. माहिती दिली नसेलच तर माहिती मिळवण्यासाठी दिलेल्या अर्जानंतरची ६० दिवसाची मुदत मोजून ती तारीख लिहावी. रकाना क्र. ६ मध्ये अपिलाची कारणे लिहावीत. जसे की, दिलेली माहिती चुकीची आहे, दिलेली माहिती अर्धवट आहे किंवा मागितलेली माहिती दिलेली नाही वगैरे. रकाना क्र. ७(एक) मध्ये माहितीच्या अर्जात नमूद केलेल्या माहितीचे स्वरूप व विषय लिहावा. रकाना क्र ७(दोन) भरताना ज्या अधिकाऱ्याकडे माहिती मागितली होती त्याच्या कार्यालयाचा उल्लेख करावा. अपिलावर अपिलकाराची सही आवश्यक आहे. ठिकाण व अर्जाची दिनांक लिहिणे आवश्यक आहे. शिवाय माहितीच्या अधिकाराच्या अर्जासोबत जे १० रू कोर्ट फी स्टॅंप लावले होते. तसेच कोर्ट फी स्टॅंप मात्र रू. २० किंमतीचे या अपिल अर्जावर लावणे आवश्यक आहे. अपिल अर्जासोबत माहिती अर्जाची झेरॉक्स प्रत जोडावी. अपिल अर्जाच्या दोन प्रति कराव्यात (झेरॉक्स किंवा लिहून कार्बन घालून) असा सर्व पूर्ण झालेला अपिल अर्ज. अपिल अधिकाऱ्याकडे देऊन त्याची पोहोच पावती घ्यावी किंवा अपिल अर्ज साध्या पोष्टाने सुध्दा पाठविला तरी चालतो. अपिल अर्ज टाईप करून घ्यावा लागत नाही तो हाताने लिहीला तरी चालतो.

अपिलाचा निर्णय कसा, कधी लागतो?

विहीत नमुन्यात पहिला अपिल अर्ज दाखल झाल्यापासून तीस (३०) दिवसात संबंधित अधिकाऱ्याने अपिलाचा निर्णय अपिलकरास कळविला पाहिजे. अपिलाचा निर्णय खालीलपैकी कोणताही असू शकतो.

माहिती अधिकारी यास माहिती पुरविण्याबाबत आदेश. योग्य व अचुक माहिती पुरविण्याबाबतचा आदेश.

मात्र पहिल्या अपिलाचा निर्णय अपिलकारास कळवितांना सुध्दा अपिलकारास हा निर्णय मान्य नसेल तर तो दुसरे अपिल कोणाकडे आणि किती दिवसात करू शकेल याचा तपशील द्यावा लागतो.

दुसरे अपिल कोणाकडे करावे, कसे करावे :-

समजा माहिती अधिकाऱ्याने मागणी केल्याप्रमाणे माहिती दिली नाही किंवा अपुरी किंवा चुकीची माहिती दिली. त्याविरूध्द पहिले अपिल अपिल अधिकारी यांचेकडे केले. पण त्यांनी सुध्दा समाधानकारक उत्तर दिले नाही किंवा उत्तर मुदतीत दिले नाही तर दुसरे अपिल करता येते. हे अपिल राज्य सरकारच्या अख्त्यारीतील विषयात राज्य माहिती आयुक्ताकडे किंवा केंद्र सरकारच्या अख्त्यारीतील विषयात केंद्रिय माहिती आयुक्ताकडे करता येईल. आपल्याला जास्तीत जास्त माहिती राज्य सरकारशी संबंधित असते. तेंव्हा आपण राज्य माहिती आयुक्ताकडे दुसरे अपिल कसे करावे याबाबतची माहिती घेवू.

याच पध्दतीने केंद्रिय माहिती आयुक्ताकडे देखील दुसरे अपिल करू शकतात.

**राज्य माहिती आयुक्तांचा पत्ता :–** राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य, नविन प्रशासकीय भवन, १३ वा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई - ३२.
दूरध्वनी क्र. ०२२ - २२८५६०७८

**केंद्रिय माहिती आयुक्तांचा पत्ता :–** केंद्रिय माहिती आयुक्त, ब्लॉक नं. ४, ५ वा माला, पुराना जवाहरलाल नेहरू विद्यापिठ कँपस, नवी दिल्ली - ११००६७.

**<u>दुसरे अपिल करण्यासाठी नमुना अर्ज</u>**

प्रेषक : - (अपिल करणाऱ्याचे नाव व पत्ता)

प्रति,

(अपिल अधिकाऱ्याचे नाव, पदनाम, पत्ता)

१. अपिलकाराचे संपूर्ण नाव :-
२. पत्ता :-
३. राज्य जन माहिती अधिकाऱ्याचा तपशील
४. पहिले अपिल अधिकाऱ्याचा तपशील
५. ज्या आदेशाच्या विरूध्द अपिल केले आहे तो आदेश मिलाल्याचा दिनांक
६. अपिलाची कारणे
७. माहितीचा तपशील
एक) हव्या असलेल्या माहितीचे स्वरूप व विषय
दोन) माहिती ज्या कार्यालयाशी किंवा विभागाशी संबंधित आहे त्याचे नाव

ठिकाण :-

दिनांक :- अपिलकाराची सही

**दुसरा अपिल अर्ज कसा भरावा, मुदत किती ?**

पहिला अपिल अर्ज आणि दुसरा अपिल अर्ज यामध्ये बरेचसे साम्य आहे. फक्त रकाना क्र. ४ मध्ये पहिले अपिल कोणाकडे केले होते. त्याचे नाव नमुद करणे आहे. पहिला अपिल अर्ज कसाभरावा याबाबत वर सांगितले आहे. या अर्जासोबतसुध्दा रू.२० किंमतीची कोर्ट फी स्टॅंप जोडायचे आहेत.

पहिल्या अपिल अर्जाचा निर्णय आल्यानंतर ९० दिवसात दुसरा अपिल अर्ज सादर करावा लागतो. केंद्रिय माहिती आयुक्तांकडे इंग्रजी किंवा हिंदीत अर्ज करावा. पहिल्या अपिल अर्जाप्रमाणे दुसऱ्या अपिल अर्जावर निर्णय घेतला जातो. मात्र माहिती अधिकाऱ्याने माहिती चुकीची दिली, उशीरा दिली किंवा दिली नाही तर राज्य माहिती आयुक्त / केंद्रिय माहिती आयुक्त दंड करू शकतात.

**संरक्षण :–**

माहितीच्या अधिकाराचा वापर करून माहिती मागितली म्हणून कोणत्याही न्यायालयात दावा करतायेत नाही. त्यामुळे कोणतेही अधिकारी, कर्मचारी माहिती मागणाऱ्याशी वैरभावाने, द्वेषाने, डूक धरून वर्तन करणार नाही. हे महत्त्वाचे संरक्षण माहिती अधिकाराच्या कायद्याने माहिती मागणाऱ्यांना दिलेली आहे. म्हणजे निर्भिडपणे माहिती मागवावी अशी कायदा करणाऱ्यांची अपेक्षा आहे तो दाखविण्याचा आपण प्रयत्न करू या.

## काही अनुभव

गोष्ट छोटी असो वा मोठी माहिती अधिकाराचा वापर करून कशी माहिती घेता येते आणि कामे कशी होतात. याची खालील उदाहरणे.

**आणि रस्त्यांचे अंतर दुरूस्त झाले !**

राष्ट्रीय महामार्गावरील एकाच ठिकाणाहूने एकाच गावी जाण्यासाठी अंतर मात्र वेगवेगळे दर्शविले होते माहिती अधिकाराखाली संबंधित अधिकाऱ्याकडे याबाबतची माहिती विचारल्यावर चुकीचे फलक दुरूस्त झाले. अनेकवेळा अशा सरकारी चुंबकाबद्दल वृत्तपत्रात छापून येते पण त्यानंतर अपेक्षित बदल होतो असे नाही. ते काम माहितीच्या अधिकाराच्या वापराने झाले. तसे हे काम फार किरकोळ आहे पण सरकार दरबारी हे वेळेवर होत नाही.

**आणि निराधार इसमास पेन्शन सुरु झाली !**

उपळा (मा.) ता. जि. उस्मानाबाद श्रावण कांबळे या निराधाराला मिळत असलेली सरकारी पेन्शन दो वर्षापुर्वी अचानक बंद झाली. त्याची पेन्शन का बंद केली अशी विचारणा तहसीलदार यांना माहितीच्या अधिकाराखाली करताच उत्तरात त्यांनी पेन्शन सुरु केल्याचे कळविले. तहसील कार्यालयात एखादे काम करून घेण्यासाठी किती चकरा माराव्या लागतात याचा अनुभव खेड्यातल्या लोकांना आहे. मात्र बंद पेन्शन सुरु करणोठी माहिती अधिकाराखाली कशी होऊ शकतात हे दाखवितात तर नगर परिषदसारखे सरकारी ऑफिस कसे चुकीचे आणि बेकायदेशीर निर्णय घेते याचे उदाहरण खाली देत आहे. माहितीचा अधिकार वापरल्याने ती चूक कशी दुरूस्त होते हे स्पष्ट होईल.

**माहितीच्या अधिकाराने बंद केली नामांतर फी :–**

उस्मानाबाद नगरपरिषद ही संपूर्ण महाराष्ट्रातील अशी एकमेव नगरपरिषद आहे की, जी नागरिकांकडून नामांतराच्या कामासाठी खरेदीखताच्या दोन टक्के इतकी रक्कम नामांतर फी वसूल करीत होती. राष्ट्र सेवा दलाच्या ग्राहक चळवळीचे श्री. शंकर व्यंकटेश वादोने यांच्या ही बाब लक्षात आली आणि त्यांनी माहितीच्या अधिकारात माहिती विचारून, माहिती मिळवण्याचा पाठपुरावा करून बेकायदेशीररित्या सुमारे १६ वर्षे वसूल केली जात असलेली नामांतर फी रद्द करण्यात यश मिळविले त्याची ही यशोगाथा श्री. शंकर वादोने यांनी 'सर्वांसाठी ग्राहक चळवळ' या नावाने राष्ट्र सेवादलाचा नवीन उपक्रकम हाती घेऊन या उपक्रमा अंतर्गत दि. २५/१०/२००५ रोजी मुख्याधिकारी नगरपरिषद, उस्मानाबाद यांना माहितीच्या अधिकारात विहित नमुन्यात अर्ज देऊन विचारणा केली की, नगरपरिषदेच्या स्थायी समितीच्या ठराव क्रमांक १८६ सन १९९० अन्वये नगरपरिषद नामांतर फी किंमतीच्या दर हजारी ठरविण्याबाबत जो ठराव झाला आहे तो ठराव कोणत्या कायद्याचा कोणत्या कलमातील तरतुदीनुसार करण्यात आला आहे. नगरपरिषदेने या माहितीच्या अर्जाचे उत्तर दि. ७/११/२००५ रोजी दिले. मात्र त्यांनी हा ठराव कोमत्या कायद्याच्या कोणत्या कलमातील तरतुदीनुसार केला गेला याची माहिती न देता या ठरावास मा. जिल्हाधिकारी व मा. आयुक्त औरंगाबाद यांची परवानगी आहे असे कळविले. त्यावर श्री. शंकर वादोने यांनी दि. ३/१/२००६ रोजी विभागीय आयुक्त औरंगाबाद यांच्याकडे सदर प्रकरणात माहितीच्या अधिकाराखाली पहिले अपिल दाखल केले त्यात त्यांनी असे नमुद केले की, नगरपरिषदेने त्यांना १३/१/२००६ रोजी विचारलेली माहिती न देता इतर माहिती पुरविली आहे. या प्रकरणाची सुनावणी

विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक नगरपरिषद प्रसासक औरंगाबाद यांच्याकडे झाली.

त्यांनी नगरपरिषदेस दि. १३/१/२००६ रोजी असा आदेश दिला की, नगरपरिषदेच्या स्थायी समितीचा ठराव क्र. १८६ सन १९९० कायद्याच्या कोणत्या कलमानुसार घेण्यात आला याची माहिती नगरपरिषदेने श्री. वादोने यांना याबाबतची माहिती दि. ४/२/२००६ रोजी कळविले त्या पत्रात मुद्दा क्र. १ मध्ये महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पचायती व औद्योगिकनगरी अधिनियम १९६५ मध्ये नामांतर फी बाबत कसलीही तरतुद नाही. त्या कायद्यातच नगरपरिषदेला नामांतर फी घेण्याचा अधिकार नाही ही बाब नगरपरिषदेने स्वतःच कळविली. माहितीच्या अधिकारात मिळालेले हे पहिले यश होय. त्यामुळे नगरपरिषदेने गेल्या १६ वर्षात अनेक लोकांकडून २ टक्के दराने नामांतर फी वसुल केली आहे. ती वसुली पूर्णपणे बेकायदेशीर आहे ही बाब स्पष्ट होते. राष्ट्र सेवा दलाच्या 'सर्वांसाठी ग्राहक चळवळीला' मिळालेले हे पहिले घवघवीत यश होय. राष्ट्र सेवा दलाच्या सर्वांसाठी ग्राहक चळवळीने ही बाबा नागरिकांच्या निदर्शनास आणून दिली. नगरपरिषदेकडून भरलेली नामांतर फी परत मिळणेबाबत अर्ज करण्यासाठी नागरिकांना आवाहन केले. त्या आवाहनानुसार नगरपरिषदेने उत्तर देण्याची तत्परता दाखविली असली तरी संपूर्ण फी जनतेला परत करावी लागणार आहे. त्यासाठी राष्ट्र सेवा दल प्रणित सर्वांसाठी ग्राहक चळवळ कायदेशीर लढा उभारण्याच्या तयारीत आहे.

हजारो लोकांकडून लाखो रूपयांची वसुली :-

राष्ट्र सेवा दल प्रणित सर्वांसाठी ग्राहक चळवळीला या विषयात अभ्यास करण्याचे ठरविल्यानंतर असे लक्षात आले की, १९९० नंतर विशेषतः १९९३ नंतर भूकंप झाल्याने अनेक लोकांनी नवी घरे घेतली, नवीन भूखंड खरेदी केले. त्या सर्व लोकांकडून नगरपरिषदेने मोठ्या प्रमाणावर नामांतर फी ची रक्कम वसुल केलेली आहे. नगरपरिषदेकडे विचारले असता त्यांना ती माहिती तातडीने पुरविता आली नाही. ११ वर्षात ३८४१ लोकांकडून नामांतर फी वसुल झालेली आहे. त्याचा नामनिहाय तपशील देण्यासाठी चळवळीने नगरपरिषदेला मुदत द्यावी अशी विनंती केली आहे. चळवळीने माहितीच्या अधिकारानुसार अशी मुदत दिली आहे. नगरपरिषदेने अशी माहिती दिली तेंव्हा रु. ५२ लाख ५० हजार रक्कम नामांतर फी म्हणून बेकायदेशीरपणे वसुल केली आहे. सध्या भूखंड खरेदीकरणे हे पैसे जमविण्याचे उत्तम साधन मानले गेले असल्याने मोठ्या प्रमाणावर लोक गुंतवणूक करतात. भूखंड खरेदी झाली की त्यावर आपले नाव लागावे अशी लोकांची अपेक्षा असते. त्याबाबत नगरपरिषदेकडे संपर्क साधला जातो आणि नगरपरिषद त्यांच्याकडून नामांतर फी वसुल करते. एकाच्या हातून दुसऱ्याकडे तातडीने मालमत्ता हस्तांतरीत झाली असली तरी त्यावर नगरपरिषद नामांतर फी आकारते असा अनुभव आहे.

नवीन भूखंड घेतलेला नागरिक जेव्हा नामांतर करण्याबाबतच्या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी नगरपरिषदेत जातो त्यावेळी संबंधित कर्मचारी सुरुवातीला ४ टक्क्याने नामांतर फी आकारण्याचे ताळेबंद सांगतो आणि चिरीमिरी दिली तर ती रक्कम कमी होईल असे सुचवितो. त्याच्या हातात चिरीमिरी पडली की तो नामांतर फी २ टक्क्याने आकारतो असा अनुभव अनेकांनी ग्राहक चळवळीत सांगितला.

ठराव बारगळला :-

नगरपरिषदेने अपिलानंतर शंकर वादोने यांनी जी माहिती पुरविली व अपिल आदेशानुसार जी कागदपत्रे पुरविली त्यासोबत आयुक्त औरंगाबाद यांचे

दि.१/४/१९९१ चे पत्र आणि जिल्हाधिकारी उस्मानाबाद यांचे दि. १८/७/२००५ चे पत्र जोडले. या दोन्ही पत्रात स्पष्टपणे नामांतर फी वसूल करावी असे कोठेही म्हंटलेले नाही. उलट जिल्हाधिकारी उस्मानाबाद यांना दिलेल्या दि. १८/७/२००५ च्या पत्रात अनु. क्र. १३ वर अशी फी वसूल करता येणार नाही असे स्पष्ट निर्देश दिलेले आहेत. त्यानंतर नगरपरिषदेने हे प्रकरण उपसंचालक नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांच्याकडे नेले. त्यांनी जिल्हाधिकारी उस्मानाबाद यांना दि. ३/१/२००६ रोजी पत्र लिहून अशी विनंती केली की, जिल्हाधिकारी यांनी त्यांचे दि. १८/७/२००५ चे पत्रातील अट क्र. १३ रद्द करावी त्याचबरोबर उपसंचालक नगरपरिषद यांनी नगरपरिषदेला असे पत्र दिले की, यांनी आपली उपविधी बदलून नामांतर फी आकारण्यासंदर्भात सर्वसाधराण सभेत ठराव घ्यावा. प्रशासनाच्या या पत्राला अनुसरून नगरपरिषदेने दि. १२/५/२००६ रोजी सर्वसाधारण सभा बोलाविली या सभेत पुन्हा नामांतर फी वसुलीबाबतचा ठराव प्रस्तापित केला. परंतु भारतीय जनता पक्षाचे नगरसेवक उदय निंबाळकर यांनी या ठरावाला लेखी विरोध करून नगरपरिषदेस नामांतर फी लावण्याचा कोणताही कायदेशीर अधिकार नाही. असा कायदा करण्याचा अधिकार राज्यसरकारला आहे आणि जर नगरपरिषदेने असा ठराव केला तर तो विधीमंडळाचा विशेष अधिकाराचा भंग होील. त्याचा परिणाम म्हणून नगरपरिषद बरखास्त होईल वगैरे भूमिका घेतल्याने सर्व नगरसेवकांनी पक्षीय अभिनिवेश विसरून या ठरावास विरोध केला यामुळे हा ठराव बारगळला.

## नवीन किंवा डुप्लीकेट रेशन कार्ड तयार करण्यास विलंब

माहिती अधिकारी
अन्न नागरी पुरवठा विभाग :-
कार्यालय :-
ठिकाण :-

**विषय :–** माहितीचा अधिकार २००५ अंतर्गत माहिती मिळणे बाबत.

महोदय,

मी आपल्या विभागामध्ये ------ दिनांक रोजी ------ नवीन/डुप्लीकेट रेशन कार्ड मिळण्यासंदर्भात अर्ज केला होता. (अर्जाचा नमुना जोडणे) परंतु अजुन मला माझे रेशन कार्ड मिळालेले नाही.

कृपया यासंदर्भात खालील माहिती उपलब्ध करून द्यावी.

१. माझ्या अर्जावर दररोज केलेली कारवाई किंवा दैनिक प्रगति रिपोर्ट द्यावा. माझा अर्ज कोणकोणत्या अधिकाऱ्याकडे गेला. कोणत्या अधिकाऱ्याकडे किती दिवस राहिला आणि या काळात त्या अधिकाऱ्याने त्यावर काय कारवाई केली. त्याचे विवरण द्यावे.
२. कृपया त्या अधिकाऱ्याचे नाव आणि पद सांगा ज्यांनी त्या अर्जावर कारवाई करायला पाहिजे होती पण केली नाही.
३. आपलं काम व्यवस्थित न करणाऱ्या आणि जनतेला त्रास देणाऱ्या त्या अधिकाऱ्यांच्या विरूध्द कोमती कार्यवाही केली जाईल? ही कार्यवाही केव्हापर्यंत करण्यात येईल.
४. माझे काम केंव्हा पूर्ण होणार?
५. कृपया मला सर्व अर्जाची यादी द्यावी. जे माझा अर्ज दिल्यानंतर जमा करण्यात आल्या आहेत. त्या यादीत खालील माहिती असावी.
   १) अर्जदाराचे नाव २) पावती संख्या ३) अर्जाची तारीख ४) कारवाईची तारीख.
६. कृपया मला अशा रेशन कार्ड मधील त्या भागाची वरील माहिती दर्शविणाऱ्या भागाच्या छायाप्रती द्यावेत.
७. माझ्या अर्जानंतर जर कोणाच्या अर्जावर कारवाई केली असेल तर त्याचे कारण सांगा.
८. मागून येणाऱ्या अर्जाची पूर्तता केली असेल तर त्यामागे कोणाचा हात आहे याची तपासणी केंव्हापर्यंत करण्यात येईल?
९. माझे रेशन कार्ड केंव्हा मला मिळणार? याची सूचना मला द्यावी.

मी अर्जाची फीस म्हणून १० रू. वेगळे जमा करत आहे.

(अर्जदाराची सही)

# माहितीचा अधिकार २००५ महत्वपूर्ण वैशिष्ट्ये

**माहितीचा अधिकार २००५ प्रत्येक नागरिकास हे अधिकार देत आहे की,**

**१) सरकारला कुठलाही प्रश्न विचारू शकतो आणि माहिती घेऊ शकतो.**

**२) कुळल्याही सरकारी दस्ताऐवजाच्या प्रति घेऊ शकतो.**

**३) कुठल्याही सरकारी कागदपत्रांची चौकशी करू शकतो.**

**४) कुठल्याही सरकारी कामाची चौकशी करू शकतो.**

**५) कुठल्याही सरकारी कामामध्ये वापरण्यात येणाऱ्या सामानाचे नमुने घेऊ शकतो.**

## ❊ जानने का हक ❊

मेरे सपनो को ये जानने का हक रे।
क्यों सदियों से भुके रहे है, इन्हे सजने का नाम नही ॥ धृ ॥
मेरे हाथों को य जानने का हक रे।
क्यों बरसों से खाली पडे है, इन्हे आज भी काम नहीं ॥ १ ॥
मेरे पैरों को ये जानने का हक रे।
क्यों गाव - गाव चलना पडे रे, क्यों बस का निशान नहीं ॥ २ ॥
मेरी भूख को ये जानने का हक रे।
क्यों गोदामों में सडते दाणे, मुझे मुठीभर धान नहीं ॥ ३ ॥
मेरी बुढी माँ को ये जानने का हक रे।
क्यों गोली नहीं सुई दवाखाने, पट्टी टाके का सामान नहीं ॥ ४ ॥
मेरे खेतों को ये जानने का हक रे।
क्यों बांध बने रे बडे - बडे, तो भी फसलों मे जान नहीं ॥ ५ ॥
मेरे जंगलों को ये जानने का हक रे।
कहाँ डालीयाँ ओ पत्ते तणे मिटी, क्यों झरने का काम नहीं ॥ ६ ॥
मेरी नदीयों को ये जानने का हक रे।
क्यों जहर मिलाये कारखाने, जैसे नदियों में जान नहीं ॥ ७ ॥
मेरे गाँव को ये जानने का हक रे।
क्यों बिजली न सडके न पानी, खुली राशन की दुकान नहीं ॥ ८ ॥
मेरे व्होटों को ये जानने का हक रे।
क्यों एकदिन बडे - बडे वादे, फिर पाँच साल काम नहीं ॥ ९ ॥
मेरे राम को ये जानने का हक रे। रहेमान को ये जानने का हक रे।
क्यों खून बहे रे सडकों पे, क्या सब इन्सान नहीं ॥ १० ॥
मेरे जिंदगी को जिने का हक रे।
अब हक के बिना भी क्या जिना? ये जिने के सामान नहीं ॥ ११ ॥
क्यों गोदामों में सडते हैं दाने मुझे मुठीभर धान नहीं.....

..... सौजन्य कबीर